# संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहीरात

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई चालक भरती सन २०१९

## पोलीस आयुक्त, नागपुर शहर

महाराट्र सहा.पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश ) नियम, २०१९ मधील तरतुदीनुसार पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई चालक संवर्गात खालील रिक्त होणारी **(एकुण १०० - कार्यरत पदे १३ पदे = ८७ भरावयाची पदे** ) पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई चालक पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

| | अ.जाती | अ.जमाती | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र | इ.मा.व | एसइबीसी | इडब्ल्युएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकुण** | **-१२** | **-०७** | **-०२** | **-०२** | **-०४** | **-०२** | **-०२** | **-१६** | **-१३** | **-१०** | **-१७** | **-८७** |
| **सर्वसाधारण** | ०२ | ०४ | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०५ | ०३ | ०१ | ०४ | २५ |
| **महिला** | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ | ०४ | ०३ | ०५ | २८ |
| **खेळाडु** | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| **प्रकल्पग्रस्त** | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| **भुकंपग्रस्त** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **माजी सैनिक** | ०२ | ०१ | - | - | ०१ | - | - | ०२ | ०२ | ०२ | ०३ | १३ |
| **अंशकालीन पदवीधर** | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| **पोलीस पाल्य** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ |
| **गृहरक्षक** | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| **अनाथ** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकुण** | **१२** | **०७** | **०२** | **०२** | **०४** | **०२** | **०२** | **१६** | **१३** | **१०** | **१७** | **८७** |

अ) उपरोक्त पदे हि दिनांक ३१/१२/२०१९ अखेरपर्यन्त रिक्त होणा-या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनंशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहे (**सहा. आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, नागपुर विभाग यांच्या कडुन दिनांक १५/१०/२०१९ रोजी स्वतंत्र चालक पोलीस शिपायांची बिंदुनामावली प्रमाणित करण्यात आलेली आहे.** )

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणा-या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती ( Provisional selection ) असेल, निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होवु शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

ड) शासनाने लागू केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागु केलेले आरक्षण हे या अनुषंगाने उदभवणा-या न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधिन असेल.

२. महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, चालक पोलीस हवालदार, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०११ www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर (Home Page) वर व www.nagpurpolice.gov.in वर उपलब्ध असुन ते पोलीस शिपाई चालक पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या अमेदवारांना लागु राहतील.

**महत्वाची टीप:-**

**१.** पोलीस शिपाई चालक भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टीकरप्शन ब्युरो, नागपुर यांना दुरध्वनी क्रमांक ०७१२ - २५६१५२० वर त्वरीत संपर्क साधुन तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्त / अधीक्षक या कार्यालयातील वरिष्ठ अधिका-यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती - २०१९ तथा अपर पोलीस आयुक्त / अपर पोलीस अधीक्षक / पोलीस उप अधीक्षक ( मुख्यालय ) यांच्याशी संपर्क साधुन तक्रार करु शकतील. तसेच, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२८५५६१४ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

**२.** उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| **अ.क्र** | **कार्यालयाचे नाव** | **दुरध्वनी / मोबाईल क्रमांक** |
|---|---|---|
| **२** | पोलीस आयुक्त, नागपुर शहर या कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत ) | ०७१२-२५८४३५० (पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)) |

**(विक्रम महादेव साळी)**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
नागपुर शहर